RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ६६

दि. ०१ जुलै २०२६, वार : बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990


# ११ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## वृक्षलागवडीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि नियोजनावर भर देण्याचे निर्देश




**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील वृक्षलागवड मोहिमेला अधिक प्रभावी आणि शाश्वत स्वरूप देणे आवश्यक आहे. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, खासगी-सार्वजनिक सहभाग (पीपीपी), ग्रामपंचायतींचे वृक्षलागवडीचे नियोजन आणि विविध विभागांचा समन्वय यावर भर देण्यात यावा. यंदा ११ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट असून योग्य नियोजन आणि सर्व यंत्रणांच्या सहभागातून हे उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली हरित महाराष्ट्र आयोगाच्या वृक्षारोपण मोहिमेची आढावा बैठक झाली. यावेळी वन मंत्री गणेश नाईक, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मुख्यमंत्री फडणवीस यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, कृषी सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे, विश्वेसरैया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्रा. आर. के. इंगळे, सेवानिवृत्त सनदी अधिकारी प्रमोद बोंगीरवार, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, वन अधिकारी हे दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी श्री.परदेशी यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात व्हि बी-जी राम जी योजनेअंतर्गत वृक्षलागवड वाढविण्यावर भर द्यावा. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने उपलब्ध जमिनीचे नियोजन करून ग्रामसभेच्या ठरावाद्वारे वृक्षलागवडीचा आराखडा तयार करावा आणि तो केंद्र सरकारच्या पोर्टलवर अपलोड करावा. हे काम वेळेत पूर्ण झाल्यास वृक्षलागवडीच्या खर्चापैकी काही निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध होऊ शकतो.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी आणि वन अधिकारी यांनी समन्वयाने प्रत्येक गावाचा आराखडा तयार करून उद्दिष्टे निश्चित करावीत. प्रत्येक ग्रामपंचायतीने उपलब्ध जमिनीचा योग्य वापर करून नियोजनबद्ध वृक्षलागवड करावी, यासाठी जनजागृती मोहीमही राबविण्यात यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील लागवडीसाठी आवश्यक जमीन ओळखून जीआयएस आधारित 'लँड बँक' तयार करण्यात आली असून ती जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. विभागनिहाय उद्दिष्टांचे नियमित पुनरावलोकन करावे. विभागीय आयुक्तांनी जिल्हानिहाय आढावा घेऊन नियमित अहवाल शासनाला सादर करावा, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

पुढील वृक्षलागवड हंगामापूर्वी रोपांची पुरेशी उपलब्धता राहावी यासाठी खासगी संस्था, स्वयंसेवी संस्था आणि इतर भागीदारांच्या सहकार्याने नियोजन करण्यावर भर देण्यात यावा. कृषी विद्यापीठे आणि इतर संस्थांकडे उपलब्ध मोठ्या प्रमाणातील जमिनींचाही वृक्षलागवडीसाठी उपयोग करण्यात यावा. यामुळे शासन आणि खासगी क्षेत्राच्या संयुक्त प्रयत्नातून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

वृक्ष लागवडीसाठी खासगी संस्थांचा सहभाग असलेल्या खासगी-सार्वजनिक भागीदारीचा (पीपीपी) आराखडा तयार करण्यात आला असून या आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी एकात्मिक कार्यपद्धती विकसित करण्यात आली आहे. ही कार्यपद्धती महापालिकांनाही देण्यात यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

वृक्ष लागवडीचे रिअल-टाईम मॉनिटरिंग करण्यासाठी उपग्रह तंत्रज्ञान, ड्रोनचा वापर आणि जीआयएस प्रणालीचा वापर करण्याची माहिती देण्यात आली. लागवड केलेल्या रोपांची वाढ आणि स्थिती सहा महिन्यांपर्यंत अचूकपणे तपासता येईल, अशी व्यवस्था विकसित करण्यात आली आहे. यासाठी महाराष्ट्र रिमोट सेंन्सर ॲप्लिकेशन सेंटरच्या माध्यमातून आवश्यक यंत्रणा उभारण्यात आली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी रोपांच्या उपलब्धतेचाही आढावा घेण्यात आला. सध्या वन विभागाकडे सुमारे सहा कोटी रोपे उपलब्ध असून पुढील वर्षापर्यंत ही क्षमता दहा कोटी रोपांपर्यंत वाढविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी खासगी रोपवाटिकांचा पीपीपी तत्त्वावर सहभाग वाढविण्यात येणार आहे. रोपांचे उत्पादन, विक्री आणि वितरणात खासगी गुंतवणूक वाढेल, तर वन विभाग मूळ नियोजन आणि गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी पार पाडेल, असे यावेळी वन विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

कृषी विभागाच्या वतीनेही रोपांची निर्मिती करण्यात येत असून कृषी विद्यापीठाकडील रोप वाटिकेमधून सुमारे १५ लाख रोपांची निर्मिती करण्यात येत आहे. तसेच खासगी मान्यता प्राप्त रोपवाटिकेमधून २ कोटी ६६ लाख रोपांची निर्मिती करण्यात येत असल्याची माहिती कृषी विभागाच्या वतीने देण्यात आली.

## मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे समाधान समारोह २०२६ अंतर्गत २१, २२ आणि २३ ऑगस्ट २०२६ रोजी विशेष लोकअदालत

**ठाणे/प्रतिनिधी :** मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे आर.डी. सावंत यांच्या आदेशानुसार ठाणे जिल्ह्यातील पक्षकार यांना आवाहन करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे समाधान समारोह २०२६ (ड-च-ऊक्र-छ ड-च-ठजक) या अंतर्गत २१, २२ आणि २३ ऑगस्ट, २०२६ रोजी विशेष लोकअदालत (ड्झएउख-ङ ड्जघ -ऊ-ङ-ढ) चे आयोजन केले आहे.

त्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्याकडील प्रलंबित असलेल्या प्रकरणांमधील पक्षकारांना लोकअदालतपूर्व तडजोड तसेच प्रकरण लोकअदालतमध्ये ठेवणेकामी संमती दर्शविण्याकरीता या प्राधिकरणामार्फत नोटीसेस पाठविण्यात आलेल्या असून मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांतील ठाणे जिल्ह्यातील/इतर जिल्ह्यातील संबंधीत पक्षकारांना तडजोड पूर्व चर्चा करण्याकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे, न्याय सेवा सदन इमारत, पहिला मजला, जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे आवार येथे प्रत्यक्ष अथवा अभासी पध्दतीने संपर्क करण्यास कळविलेले आहे. तरी, संबंधीत पक्षकारांनी समाधान समारोह २०२६ (ड-च-ऊक्र-छ ड-च-ठजक) या उपक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे सचिव आर.एस. पाजणकर यांनी केले आहे.

## केंद्रीय मोटार वाहन (सहावी सुधारणा) नियम, २०२६ अन्वये केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांबाबत जनसामान्यांसाठी

**ठाणे/प्रतिनिधी :** भारत सरकार, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने केंद्रीय मोटार वाहन (सहावी सुधारणा) नियम, २०२६ अन्वये केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ५२, ६२, १७४, १७६, १७७, १८१, १८२ व १८९ तसेच Form-38 मध्ये महत्वपूर्ण सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सदर सुधारणा अधिसूचना क्रमांक G.S.R. 349(E) अन्वये दि.०८ मे २०२६ रोजी राजपत्रात प्रसिद्ध झाल्या असून त्याच दिनांकापासून अंमलात आलेल्या आहेत.

सदर सुधारणांमधील प्रमुख बदल पुढीलप्रमाणे आहेत :-

(अ) ज्या कार्यक्षेत्रात Automated Testing Station (ATS) कार्यान्वित आहे, त्या क्षेत्रातील Light Motor Vehicle वर्गातील वाहनांची फिटनेस तपासणी केवळ ATS मार्फतच करणे अनिवार्य.

(ब) नवीन Non-Transport Vehicle साठी नोंदणीच्या वेळी स्वतंत्र Fitness Certificate आवश्यक नाही, नोंदणी दिनांकापासून १५ वर्षे वाहन फिट मानण्यात येईल व त्यानंतर प्रत्येक ५ वर्षांनी नूतनीकरण.

(क) फिटनेस तपासणीवेळी वाहनाचा किमान १० सेकंदांचा Geo-Tagged व्हिडिओ Mobile Application द्वारे Capture व Upload करणे बंधनकारक.

(ड) ATS Slot Booking च्या वेळी Insurance Validity, Permit Validity व PUC Validity ची पडताळणी अनिवार्य.

(इ) वाहन 'Unfit' घोषित झाल्यापासून १८० दिवसांत 'Fit' न झाल्यास End of Life Vehicle (ELV) म्हणून वर्गीकरण.

(फ) सुधारित Form-38 चाच वापर करावा, Form-38- वगळण्यात आलेला आहे.

सदर नियम सुधारणा वाहन मालक, वाहनचालक व सर्वसामान्य नागरिकांशी थेट संबंधित असल्याने, त्यांना या बदलांची पूर्व माहिती होणे अत्यंत आवश्यक व हितकारक आहे, असे नवी मुंबई सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गावंडे यांनी कळविले आहे.

## नाशिकच्या भोंसला सैनिकी शाळेत व्हायरल इन्फेक्शनचा उद्रेक; अनेक विद्यार्थी रुग्णालयात!

**नाशिक/प्रतिनिधी :** भारतीय सैन्यदलात करिअर करू इच्छिणाऱ्यांना सैनिकी शिक्षण देणाऱ्या नाशिक येथील प्रसिद्ध भोंसला सैनिकी निवासी शाळेतील अनेक विद्यार्थी 'व्हायरल इन्फेक्शन'ने आजारी पडल्याची बाब समोर आली आहे. मुला-मुलींच्या सैनिकी शाळेत हा प्रकार घडला. विद्यार्थी एकत्रित वास्तव्यास असतात, त्यामुळे हा आजार वेगाने पसरल्याचे सांगितले जाते. विद्यार्थ्यांवर संस्थेच्या आवारातील रुग्णालयात उपचार करण्यात आले असून, त्यांची प्रकृती चांगली असल्याचे स्पष्टीकरण संस्थेने दिले आहे.

सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन (सीएचएमई) सोसायटीच्या कॉलेज रोड, समर्थनगर लगतच्या आवारात भोंसला सैनिकी निवासी (मुलांची) आणि मुलींची अशी स्वतंत्र शाळा आहे. या दोन्ही शाळांमध्ये हा प्रकार घडला.

# दिव्यांगासाठी मोफत संगणकीय व व्यावसाईक प्रशिक्षणाचे आयोजन

**ठाणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा परिषद, सांगली अंतर्गत कार्रत शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह ही संस्था प्रौढ दिव्यांगासाठी मोफत प्रशिक्षण देणारी पश्रि्चम महाराष्ट्रातील एकमेव शासकीय संस्था आहे. या संस्थेतील प्रशिक्षण वर्गांना महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई ची शासन मान्यता आहे.या संस्थेला अखिल भारतीय स्तरावरील FICCI -W-RD 1999 हा प्राप्त झालेला आहे. सन २०२६-२७ या चालू शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देणे सुरु आहे. माफक जागा असल्याने त्वरीत संपर्क साधा.

प्रवेशासाठी नियम अटी व सवलती.

१.अभ्यासक्रमाचे नांव - अ) सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर ऑपरेशन वुईथ एम.एस.ऑफिस (संगणक कोर्स). शैक्षणिक पात्रता - किमान इ.८वी पास.

अभ्यासक्रमाचे नांव - ब) मोटार अॅन्ड आर्मेचर वायडींग, सबमर्सिबल पंप सिंगल फेज, (इलेक्ट्रीक कोर्स). शैक्षणिक पात्रता - किमान इ.९ वी पास.

२. वयोमर्यादा : १६ ते ४० वर्ष. ३. प्रशिक्षण कालावधी : १ वर्ष. ४. फक्त दिव्यांग मुलांनाच प्रवेश दिला जातो.

५. सोई व सवलती -

प्रशिक्षण कालावधीत राहण्याची, जेवणाची व प्रशिक्षणाची मोफत सोय. अद्यावत व परीपूर्ण संगणक कार्यशाळा. भरपूर प्रॅक्टीकल्स व व्यवसायाभिमुख मोफत प्रशिक्षण. नेटवर्कींग व इंटरनेटची सुविधा. अनुभवी व तज्ञ निदेशक. उज्वल यशाची परंपरा. समाज कल्याण विभागाकडून स्वयंरोजगारासाठी व्यवसायासाठी बीज भांडवल योजना.

६. अर्ज केंव्हा, कसे व कोठे करावेत.

प्रवेश अर्ज व माहितीपत्रक अधिक्षक, शासकीय प्रौढ दिव्यांग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह, टाकळी रोड, म्हेत्रे मळा, गोदड मळ्याजवळ, मिरज ता. मिरज जि. सांगली पिनकोड: ४१६ ४१०, नंबर ०२३३-२२२२९०८, मोबाईल ९९२२५७७५६१/९३२५५५५९८१ या पत्यावर पोस्टा व्दारे किंवा समक्ष मोफत मिळतील. प्रवेशासाठी कोणतीही फी आकारली जाणार नाही. प्रवेश अर्ज पूर्णपणे भरुन फोटोसह संस्थेकडे पाठवावेत किंवा समक्ष भरुन द्यावेत. प्रवेश अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, SSC मार्कशिट व प्रमाणपत्र, अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र, आधार कार्ड, UDID कार्ड, Domicile प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला यांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. प्रवेश अर्ज संस्थेकडे पाठवावेत. प्रवेश अर्ज प्राप्त झाल्यानंतर तज्ञ समिती व्दारे मुलाखती घेऊन प्रवेश देण्यात येईल.

तरी माफक जागा असल्याने गरजू दिव्यांगाना या सुवर्ण संधीचा लाभ घेण्यासाठी त्वरीत संपर्क साधा. ग्रामीण व शहरी भागातील लोकांना आवाहन करण्यात येते की या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपणांस ज्ञात असलेल्या गरजू दिव्यांग बांधवाना या शासकीय योजनेची माहिती करुन द्यावी, असे शासकीय प्रौढ अपंग प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह मिरज, ता. मिरज, जि. सांगली अधिक्षक यांनी कळविले आहे.

## जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये कर्जमुक्तीची रक्कम जमा होण्यास सुरुवात होणार आहे. योजनेची अंमलबजावणी अंतिम टप्प्यात आहे. या योजनेमुळे सुमारे ५६ लाख शेतकरी कुटुंबांना या निर्णयामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

या योजनेअंतर्गत थकबाकीदार पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (ओटीएस) योजना, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद आहे.

योजनेची संपूर्ण प्रक्रिया आधार क्रमांकावर आधारित व ऑनलाइन आहे. अंतिम याद्या ग्रामपंचायत, बँका, आपले सरकार सेवा केंद्र तसेच गाव चावडीवर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. लाभार्थ्यांना मोबाईल संदेशाद्वारेही माहिती दिली जाणार आहे. पात्र शेतकऱ्यांनी लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. अ

ोटीएस योजनेतील लाभार्थ्यांनी प्रथम स्वतःचा हिस्सा जमा केल्यानंतरच शासनाकडून कर्जमुक्तीची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा केली जाणार आहे. तसेच तांत्रिक अडचणींचे त्वरित निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर तक्रार निवारण समित्यांची स्थापनाही करण्यात आलेली आहे. या योजनेमुळे लाखो शेतकरी पुन्हा कर्जपात्र होऊन नवीन पीक कर्ज मिळविण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळण्याबरोबरच बळीराजाला आर्थिक स्थैर्य मिळण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अमृतची आता हरित उर्जा क्षेत्राकडे वाटचाल अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन

**ठाणे/प्रतिनिधी :** हरित ऊर्जा, स्वच्छ पर्यावरण आणि शाश्र्वत विकासाला चालना देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी Go Green India आणि सस्टेनेबल मोबिलिटी ही संकल्पना मांडली आहे. त्या दिशेने सक्रिय कार्य करण्याचे ठरवून, महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या माध्यमातून राज्यभरात ईव्ही (Electric Vehicle) चार्जिंग स्टेशन व्यवसाय प्रोत्साहन उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून युवक, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट, एमएसएमई घटक तसेच ग्रामीण भागातील इच्छुक उद्योजकांना ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, व्यवसाय सल्ला आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.



देशामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा वापर झपाट्याने वाढत असून आगामी काळात ईव्ही चार्जिंग स्टेशनचे मोठे जाळे उभारण्याची गरज निर्माण झाली आहे. आता पेट्रोल पंप प्रमाणे अनेक ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशनची नितांत गरज आहे. महाराष्ट्रामध्येही या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. या संधींचा लाभ राज्यातील युवकांना मिळावा यासाठी अमृतने हा विशेष उपक्रम हाती घेतला आहे.

**ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसायातील संधी :-** ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणी, संचालन व व्यवस्थापन, चार्जिंग उपकरणांची देखभाल, सौरऊर्जेवर आधारित चार्जिंग सुविधा, ग्रीन एनर्जी सेवा, ईव्ही संबंधित तांत्रिक सेवा, फ्रँचायझी मॉडेल व्यवसाय तसेच ग्रामीण भागामध्ये चार्जिंग हब उभारणी अशा विविध क्षेत्रांमध्ये व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. भविष्यात ईव्ही क्षेत्र हे सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या उद्योग क्षेत्रांपैकी एक ठरणार असल्याने प्रशिक्षित उद्योजकांना मोठ्या प्रमाणावर लाभ मिळणार आहे.

**उपक्रमाचे वैशिष्ट्य :-** अमृतच्या या विशेष उपक्रमांतर्गत सहभागी लाभार्थ्यांना ईव्ही क्षेत्राविषयी मूलभूत ते प्रगत प्रशिक्षण, व्यवसाय नियोजन, प्रकल्प अहवाल तयार करणे, चार्जिंग स्टेशन स्थापनेसाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, शासनाच्या विविध योजनांची माहिती, बाजारपेठेचा अभ्यास आणि व्यवसाय व्यवस्थापनाचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. या क्षेत्रातील भारतीय स्वदेशी कंपन्या आणि तज्ञ मार्गदर्शक यांच्या सहाय्याने हा उपक्रम यशस्वी केला जाणार आहे. याशिवाय अमृतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभही पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यामुळे व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य मिळण्यास मदत होणार आहे.

**पात्रता व अटी :-** या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी युवक-युवती, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट (डक्रह), एमएसएमई उद्योजक, शेतकरी उत्पादक गट, ग्रामीण उद्योजक तसेच स्वतः चा उद्योग सुरू करू इच्छिणारे नागरिक पात्र राहतील. अमृतच्या वैयक्तिक व्याज परतावा योजनेचा लाभ घेण्यासाठी अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांसाठी आवश्यक असलेल्या पात्रता व अटी लागू राहतील.

**कोणत्या क्षेत्रात रोजगार व करिअरच्या संधी?** ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसायाबरोबरच ऊर्जा व्यवस्थापन, चार्जिंग नेटवर्क ऑपरेशन, इलेक्ट्रिकल देखभाल, तांत्रिक सेवा, ग्रीन एनर्जी प्रकल्प, ईव्ही उपकरण विक्री व सेवा, तसेच उद्योजकता विकास या क्षेत्रांमध्ये रोजगार व करिअरच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत. ग्रामीण भागातील युवकांसाठीही हा व्यवसाय उत्पन्नाचे प्रभावी साधन ठरू शकतो.

**स्वयंरोजगारासाठी विशेष सहाय्य :-** स्वतःचा अमृत ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांना अमृतकडून आवश्यक मार्गदर्शन, व्यवसाय सल्ला, मदत तसेच अमृतच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ दिला जाईल. त्यामुळे नवोदित उद्योजकांना व्यवसाय उभारण्यासाठी विशेष मदत मिळणार आहे.

## संपादकीय...

### मंदिरांमधील देणग्यांचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक करणे गरजेचे

देशातील कोट्यवधी जनतेचे श्रद्धास्थान असलेल्या अयोध्येतील श्री प्रभू राम मंदिरात भाविकांनी दिलेल्या देणग्या आणि मौल्यवान वस्तूंमध्ये मोठा घोटाळा झाल्याचे उघडकीस आल्याने हे असे झालेच कसे, असा प्रश्न लोकांच्या मनात निर्माण होणे साहजिक आहे. अयोध्येतील राम जन्मभूमी मुक्त करण्यासाठी कारसेवकांनी केलेल्या आंदोलनात बाबरी मशीद १९९२ मध्ये उद्धस्त झाली. या घटनेपूर्वीपासून गेली कित्येक वर्षे बाबरी मशीद-राम जन्मभूमीचा वाद न्यायालयात प्रलंबित होता; पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात भाजपचे सरकार स्थापन झाल्यावर या विषयाला गती मिळाली. अयोध्येत भव्य राम मंदिर उभारले गेले. २०२४ पासून प्रभू रामचंद्राचे दर्शन आम जनतेसाठी खुले झाले. अशा श्रद्धास्थानावर भाविकांनी दिलेल्या देणग्या व अर्पण केलेल्या मौल्यवान वस्तू यांत घोटाळा होईल, याची कोणी स्वप्नातही कल्पना केली नसावी. भक्तांनी दिलेल्या देणग्यांमध्ये घोटाळा झाल्याचे उघडकीस आल्यानंतर भाजप सरकारने तत्काळ विशेष तपास पथकाची (एसआयटी) नेमणूक केली. एसआयटीने दिलेल्या प्राथमिक अहवालानंतर क्षणाचाही विलंब न लावता पोलिसांनी मंदिरातील आठ जणांना अटक करून त्यांची तुरुंगात रवानगी केली. आजवर ८० लाख रुपये छाप्यातून वसूल झाले असले, तरी ही रक्कम खूप मोठी असू शकते. या कर्मचाऱ्यांच्या मागे नेमके मोठे मासे कोण आहेत, याचा एसआयटी शोध घेत आहे. गैरव्यवहाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे सरचिटणीस चंपत राय आणि सदस्य, विश्वस्त अनिल मिश्रा यांनी राजीनामे दिले. घोटाळ्याची व्याप्ती आणखी वाढली आहे. चंपत राय व अनिल मिश्रा यांचा या घोटाळ्यात किती सहभाग व संबंध होता, हे सखोल चौकशीनंतर स्पष्ट होईल. २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी हा कोट्यवधी हिंदूंच्या श्रद्धेचा विषय असल्याचे मान्य केले व श्रीरामाचे भव्य मंदिर उभारण्याचा मार्ग मोकळा झाला. श्रीराम मंदिराच्या उभारणीसाठी २०२० मध्ये श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाची स्थापना करण्यात आली. त्याचे संस्थापक सरचिटणीस म्हणून चंपत राय यांची नेमणूक करण्यात आली. मंदिराची उभारणी व देणग्यांचे व्यवहार हाताळणीत चंपत राय यांची सुरुवातीपासूनच महत्त्वाची भूमिका राहिली. त्यांनी दिलेल्या राजीनाम्यानंतर न्यासाच्या एकूण कारभाराविषयी अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. चंपत राय यांचा माजी वाहनचालक रामशंकर यादव ऊर्फ टिन्नू यालाही पोलिसांनी अटक केली. देणग्या हताळणाऱ्या सात हिशेब कर्मचाऱ्यांना अटक झाली. एसआयटीने नऊ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असला, तरी आठ जणांना अटक केली आहे. अज्ञात आरोपी आणखी कोण- कोण आहेत, हे लवकरच पुढे येईल. देणगी घोटाळा प्रकरणाची चौकशी सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली व्हावी, अशी मागणी विरोधी पक्षांकडून केली जात आहे. तसेच, श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यास बरखास्त करावा, अशीही मागणी पुढे येत आहे. देणग्यांमध्ये अपहार झाला, हे उघड आहे. हा प्रकार केंद्रात व राज्यात असलेल्या भाजप सरकारने वेळीच उघड केला, तत्काळ एसआयटी नेमून आठ जणांची रवानगी तुरुंगात केल्याने हे प्रकरण तडीस जाण्याची आशा निर्माण झाली आहे. न्यासाच्या मुख्य पदाधिकाऱ्यांचे राजीनामे घेऊन त्यांना तेथून हटवण्यात आल्याने चौकशीचा मार्ग बराचसा मोकळा झाला. वास्तविक, या आर्थिक घोटाळ्याला राजकीय रंग देणे चुकीचे आहे. त्यामुळे घोटाळ्याचे गांभीर्य कमी होण्याचा किंवा मूळ मुद्दा बाजूला पडण्याचा धोका आहे. काँग्रेस व समाजवादी पक्षाने त्यात राजकारण सुरू केल्याचे दिसते. एसआयटी चौकशी चालू असताना राम मंदिराची कोणी बदनामी करू नये, असे आवाहन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी केले असले, तरी त्याबद्दलची मोठी जबाबदारी खुद्द त्यांच्यावरच असल्याने ते प्रकरण कसे हाताळतात, हे स्पष्ट होईलच. देणग्यांची रोख रक्कम मोजणाऱ्या प्रमुख कर्मचाऱ्यांनाही अटक झाली. देणगी घोटाळ्याचा तपास तत्परतेने व पारदर्शक व्हावा, अशी सर्वांचीच अपेक्षा आहे. एसआयटी तपास हा काही राजकारणाचा विषय होऊ नये. जे दोषी आहेत, त्यांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. देणग्या व मौल्यवान वस्तू ज्या मंदिरात अर्पण होतात, त्यांची नोंद व हिशेब अचूक व रोजच्या रोज असला पाहिजे. रोख रक्कम जमा करण्याच्या प्रक्रियेतील घोटाळ्यात कोणी बँक कर्मचारी असतील, तर त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. राम मंदिराच्या उद्घाटनाचा भव्य-दिव्य सोहळा २०२४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पार पडला होता. राम मंदिराची उभारणी हा त्याकडे आस लावून बसलेल्या जनतेच्या आनंदाचा व अभिमानाचा क्षण होता. म्हणूनच मंदिरात दिलेल्या देणग्यांमधे घोटाळा होत असेल, तर राम भक्तांना, भाविकांना, मंदिरासाठी छोटे-मोठे योगदान देणाऱ्या प्रत्येकाला दु:ख होणे स्वाभाविक आहे. अटक केलेल्या सर्वांवर चोरी, फसवणूक, गुन्हेगारीचा कट असे गंभीर गुन्हे नोंदवले आहेत; मात्र अटक केलेल्या कर्मचाऱ्यांची संपूर्ण नावे, वडिलांचे नाव, घरचे पत्ते आदी तपशिलाची न्यासाकडे नोंदच नव्हती, यावरून या विषयाचे नसलेले गांभार्य लक्षात येतेच. आर्थिक बाबींकडे दुर्लक्ष केले गेले, हेही तितकेच गंभीर. देणग्यांमध्ये नेमका कसा घोटाळा झाला, किती रकमेचा झाला व अटक केलेल्यांचा त्यात वाटा किती होता, हे लवकरच स्पष्ट होईल; पण त्याची व्याप्ती मोठी असण्याची शक्यता वर्तवण्यात येते, ती भक्तांकडून मोठ्या प्रमाणावर दिल्या गेलेल्या देणग्या आणि दिले जाणारे दान यामुळे. शिवाय, मंदिर उभारणीपासूनच झालेले सर्व आर्थिक व्यवहार स्पष्ट झाले पाहिजेत, ही मागणीही रास्त आहे. देणगी घोटाळा प्रकरणात संशयाचे धुके दूर करताना जे कुणी गुंतले असतील त्यांना कठोर शिक्षा होणे आणि मंदिर व्यवस्थापनाचा गमावलेला विश्वास पुन्हा मिळवणे, पावित्र्य राखणे, त्यासाठी पारदर्शी व्यवस्था निर्माण करणे महत्त्वाचे. अर्थात, देशभरातील मंदिरांच्या आर्थिक व्यवस्थापनाकडेही या घटनेने दिशानिर्देश केला आहे. त्याची नोंदही सरकारला घ्यावी लागेल. आजच्या डिजिटल युगात मंदिरांमधील देणग्यांचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेल. प्रत्येक देणगीची ऑनलाईन नोंद, नियमित स्वतंत्र लेखापरीक्षण, सीसीटीव्ही देखरेख आणि वेळोवेळी सार्वजनिक आर्थिक अहवाल प्रसिद्ध केल्यास भाविकांचा विश्वास अधिक दृढ होईल. श्रद्धा आणि उत्तरदायित्व यांचा समतोल राखणे, हीच प्रत्येक धार्मिक संस्थेची खरी परीक्षा आहे. राम मंदिरासारख्या राष्ट्रीय श्रद्धास्थानाने या बाबतीत आदर्श निर्माण करणे अपेक्षित आहे.

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांनी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**ठाणे/प्रतिनिधी** : एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजना महाराष्ट्र राज्यातील ३४ जिल्हयांमध्ये राबविण्यात येत असून सन २०२६-२७ अंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रु.१९.११ कोटी रक्कमेचा कार्यक्रम मंजूर आहे. खालील नमूद केलेल्या घटकांचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांचे महाडीबीटी पोर्टलवर (https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin/-griLogin ) अर्ज करण्यासाठी आव्हान करण्यात येत आहे.

बाब - लहान रोपवाटीका (०.४० ते १ हे), आर्थिक मापदंड रु.- २० लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.१०.०० लाख पर्यंत (खाजगी क्षेत्र).

बाब - मोठी रोपवाटीका (१ ते २ हे.), आर्थिक मापदंड रु.- ३० लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.२४.०० लाख पर्यंत (खाजगी क्षेत्र).

फळपिके - प्रति लाभार्थी क्षेत्रमर्यादा - २ हे. पर्यंत

बाब - स्ट्रॉबेरी, ड्रॅगनफ्रुट, पॅशन फ्रुट, किवी, द्राक्ष, खजूर (टिश्यू कल्चर), आर्थिक मापदंड रु.- २ लाख ते ६.७५ लाख / हे., अर्थसहाय्य दर - रु.०.८० लाख ते रु.२.७० लाख प्रति हे.

बाब - केळी आणि अननस (सकर्स) -ठिबक सिंचनाशिवाय, आर्थिक मापदंड रु.- १.१० लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.०.४४ लाख प्रति हे. (दोन हप्त्यात).

बाब - केळी आणि अननस (टिश्यू कल्चर) - ठिबक सिंचनाशिवाय , आर्थिक मापदंड रु.- १.७५ लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु. ०.७० लाख प्रति हे. (दोन हप्त्यात).

बाब - अवोकॅडो - ठिबक सिंचनाशिवाय, आर्थिक मापदंड रु.- १.२५लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.०.५० लाख प्रति हे. (दोन हप्त्यात).

बाब - पपई - ठिबक सिंचनाशिवाय, आर्थिक मापदंड रु.- ०.७५ लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.०.३० लाख प्रति हे. (दोन हप्त्यात).

बाब - अळिंबी उत्पादन प्रकल्प, आर्थिक मापदंड रु.- ३० लाख/युनिट, अर्थसहाय्य दर - रु.१२.०० लाख प्रति युनिट.

बाब - अळिंबी बीज उत्पादन केंद्र स्थापना करणे, आर्थिक मापदंड रु.- २० लाख/युनिट, अर्थसहाय्य दर - रु.८.०० लाख प्रति युनिट.

बाब - कंपोस्ट मेकींग युनिट, आर्थिक मापदंड रु.- ३० लाख/युनिट, अर्थसहाय्य दर - रु.१२.०० लाख प्रति युनिट.

बाब - कमी खर्चाचे अळिंबी उत्पादन प्रकल्प, आर्थिक मापदंड रु.- २ लाख/युनिट, अर्थसहाय्य दर - रु.१.०० लाख प्रति युनिट ५युनिट/लाभार्थी.

बाब - सुटीफुले, दांडयाची फुले, कंदवर्गीय फुले, आर्थिक मापदंड रु.- ०.५० ते २.५० लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.०.२० लाख प्रति हे..

बाब - बी वर्गीय मसाले पिके, आर्थिक मापदंड रु.- ०.५० लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.०.२० लाख ते रु.१.०० लाख प्रति हे..

बाब - कंदवर्गीय मसाले व बहुवर्षिय मसाला पिके, आर्थिक मापदंड रु.- १ लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.०.४० लाख प्रति हे..

बाब - खर्चीक सुगंधी वनस्पती (Tuberose, Geranium etc.), आर्थिक मापदंड रु.- १.२५ लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.०.५० लाख प्रति हे..

बाब - इतर सुगंधी वनस्पती (Lemongrass, Citronella, etc.), आर्थिक मापदंड रु.- ०.५० लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.०.२० लाख प्रति हे. .

बाब - औषधी वनस्पती (Shwet Musali,-shwagandha,Pippali etc.), आर्थिक मापदंड रु.- १.५० लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.०.६० लाख प्रति हे. . बाब - जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन (आंबा, संत्रा, मोसंबी व चिकु इ.) क्षेत्रमर्यादा - २ हे. पर्यंत, आर्थिक मापदंड रु.०.६० लाख/हे., अर्थसहाय्य दर - रु.०.२४ लाख प्रति हे. .

बाब - सामुहिक शेततळे, आर्थिक मापदंड रु.४.०० लाख/ युनिट, अर्थसहाय्य दर - आकारमानुसार जास्तीत जास्त रु.३.०० लाख/ युनिट.

बाब - वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण, आर्थिक मापदंड रु. १.५० लाख, अर्थसहाय्य दर-आकारमानुसार जास्तीत जास्त रु.०.७५ लाख/ युनिट.

बाब - हरीतगृह (CCPH) व (OVPH), आर्थिक मापदंड रु. - रु. ९५० ते १८५०/ चौ.मी. (५०० चौ.मी. ते ४००० चौ.मी.पर्यंत), अर्थसहाय्य दर - खर्चाच्या ५० टक्के अर्थसहाय्य. क्षेत्रमर्यादा - जास्तीत जास्त ४००० चौ.मी./ लाभार्थी.

बाब - बांबू / केबल पर्लिन स्ट्रक्चर, आर्थिक मापदंड रु.- रु. ४५० / चौ.मी, अर्थसहाय्य दर - खर्चाच्या ५० टक्के अर्थसहाय्य. क्षेत्रमर्यादा - जास्तीत जास्त ४००० चौ.मी./ लाभार्थी.

बाब - शेडनेटगृह ट्यूबुलर / रेक्टॅग्युलर स्ट्रक्चर, आर्थिक मापदंड रु.- रु .७१०/ चौ.मी, अर्थसहाय्य दर - खर्चाच्या ५० टक्के अर्थसहाय्य. क्षेत्रमर्यादा - जास्तीत जास्त ४००० चौ.मी./ लाभार्थी.

बाब - प्लास्टिक मल्चिंग/ जूट/ अॅग्रो टेक्सटाइल/ बायोडिग्रेडेबल आच्छादन, आर्थिक मापदंड रु.- रु.४००००/हे., अर्थसहाय्य दर - खर्चाच्या ५० टक्के अर्थसहाय्य क्षेत्रमर्यादा - जास्तीत जास्त २ हे./लाभार्थी.

बाब - फळ पिकांकरिता फळांना/ फळांच्या घडांना कव्हर (Fruit Cover Crop Cover), आर्थिक मापदंड रु.- रु.५००००/हे., अर्थसहाय्य दर - खर्चाच्या ५० टक्के अर्थसहाय्य क्षेत्रमर्यादा - जास्तीत जास्त २ हे./लाभार्थी.

बाब - तण नियंत्रक अच्छादन, आर्थिक मापदंड रु.- रु.५०/ चौ.मी., अर्थसहाय्य दर - खर्चाच्या ५० टक्के अर्थसहाय्य.

बाब - मधुमक्षिका वसाहत व मधुमक्षिका पेटी, आर्थिक मापदंड रु.- ४०००/युनिट व २०००/वसाहत, अर्थसहाय्य दर - ४०%, ५० कॉलनी/लाभार्थी.

बाब - मध काढणी यंत्र, आर्थिक मापदंड रु.- २०,०००/सेट, अर्थसहाय्य दर - ४०%, १ सेट/लाभार्थी.

बाब - ट्रॅक्टर २०(२० बी.एच.पी.) (२ डब्लू .डी. व ४ डब्लू .डी.), अर्थसहाय्य दर - जास्तीत जास्त रु.१.२५ लाख/युनिट.

बाब - पॉवर टिलर ८ अश्रवशक्तीपेक्षा कमी व ८ अश्रवशक्तीपेक्षा जास्त, अर्थसहाय्य दर - कमीत कमी रु.०.५० लाख व जास्तीत जास्त रु.१.००.

बाब - मॅन्युअल स्पेअर नॅपसॅक/फ्रुट स्प्रेअर पॉवर नॅपसॅक ८-१२ ते १६ लीटर पेक्षा जास्त क्षमता, अर्थसहाय्य दर - कमीत कमी रु. ०.०१ लाख ते रु.०.१० लाख / युनिट.

बाब - पॉवर नॅपसॅक स्प्रेअर/पॉवर संचलित, तैवान, अर्थसहाय्य दर - जास्तीत जास्त रु. ०.०३.

बाब - ट्रॅक्टर चलित स्प्रेअर ( बुम टाईप), अर्थसहाय्य दर - जास्तीत जास्त रु.०.४१.

बाब - ट्रॅक्टर चलित स्प्रेअर ( एयर कॅरीयर/ असिस्टेट ), अर्थसहाय्य दर - जास्तीत जास्त रु. १.३८.

बाब - ट्रॅक्टर चलित स्प्रेअर इलेक्ट्रोस्टॅटिक स्प्रेअर, अर्थसहाय्य दर - जास्तीत जास्त रु. २.५०.

बाब - फार्म गेट पॅक हाऊस चलित हाताळणी ट्रॉली, सॉर्टिंग टेबल, आर्थिक मापदंड रु.- रु.४.८० लाख प्रति युनिट प्रति लाभार्थी आकारमान- ९ मी. द ६ मी., अर्थसहाय्य दर - ग्राह्य भांडवली खर्चाच्या - ५० % रु.२.४० लाख.

बाब - शीतगृह युनिट प्रकार- १ (सी.एस.-१), आर्थिक मापदंड रु.- रु. ९६०० प्रति मे.टन (कमाल मर्यादा ५००० मे.टन), अर्थसहाय्य दर - बँक कर्जाशी निगडीत सर्वसाधारण क्षेत्र- ३५%.

बाब - शीतवाहन, आर्थिक मापदंड रु.- रु.३.४५ लाख प्रती मे.टन कमाल क्षमता १४ मे.टन., अर्थसहाय्य दर - सर्वसाधारण क्षेत्र-३५% बँक कर्जाशी निगडीत.

बाब - शीतवाहन, आर्थिक मापदंड रु.- रु.३.४५ लाख प्रती मे.टन कमाल क्षमता १४ मे.टन., अर्थसहाय्य दर - सर्वसाधारण क्षेत्र-३५% बँक कर्जाशी निगडीत.

बाब - प्राथमिक प्रक्रिया केंद्र, आर्थिक मापदंड रु.- रु.३५.०० लाख प्रती युनिट, अर्थसहाय्य दर - सर्वसाधारण क्षेत्र-३५% बँक कर्जाशी निगडीत.

बाब - नॉन-प्रेशराईझड व प्रेशराईझड रायपनिंग रायपनिंग चेंबर (सी.एस.-३), आर्थिक मापदंड रु.- रु. १.०० लाख ते रु.१.२० लाख प्रती मे.टन, अर्थसहाय्य दर - सर्वसाधारण क्षेत्र-३५% बँक कर्जाशी निगडीत.

बाब - कमी खर्चाचे कांदाचाळ / लसूण साठवणूक गृह, आर्थिक मापदंड रु.- रु.८००० प्रती मे.टन, अर्थसहाय्य दर - ग्राह्य भांडवली खर्चाच्या - ५०%, ५-२५ मे.टन :- रु.४००० प्रती मे.टन.

टिप :- विविध घटकनिहाय अनुदानाचे दर कमीत-कमी व जास्तीत जास्त दर्शविण्यात आलेले आहे. परंतु त्याघटक/बाबीसाठी अर्ज केल्यानंतर प्रत्यक्षात देय अनुदान निश्र्चित होईल.

वरील घटकांचा लाभ घेण्याकरीता प्रमुख अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. उपरोक्त घटकांकरीता शेतकऱ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin/AgriLogin या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. त्यानंतर प्रथम अर्ज प्रथम लाभ या तत्वावर अर्जांची निवड करण्यात येईल.

२. योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जाती प्रवर्गासाठी जातीचे प्रमाणपत्र व फार्मर आयडी असणे आवश्यक राहील.

३. लाभार्थ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याची मोका तपासणी झाल्यावर त्यांच्या बँक खात्यात निधी तात्काळ जमा करण्यात येईल.

४. उपरोक्त घटकांकरीता शेतकऱ्यांनी यापूर्वी अर्ज सादर केले असतील तर पुनश्र्च: अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.

५. उपरोक्त घटकांच्या अधिक माहितीसाठी नजिकच्या मंडळ कृषी अधिकारी / तालुका कृषी अधिकारी तसेच संबधित गावातील उप कृषी अधिकारी / सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी आयुक्तालय पुणे संचालक (फलोत्पादन) अंकुश माने यांनी केले आहे.

## महाराष्ट्र टीईटी पेपरफुटी प्रकरणात मोठी अटक; मुख्य सूत्रधार विजेंद्र गुप्ता याच्या पत्नीला पाटण्यात ठोकल्या बेड्या



पाटणा - महाराष्ट्र टीईटी () पेपरफुटी प्रकरणात एक महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील कथित मुख्य सूत्रधार विजेंद्र गुप्ता याची पत्नी सुमन कुमारी हिला पाटण्यातून अटक केली आहे. अटकेनंतर, पेपरफ ुटीमधील तिच्या सहभागाबाबत पोलीस तिची कसून चौकशी करत आहेत. विशेष म्हणजे, बिजेंद्र गुप्ता हा मूळचा बिहारमधील समस्तीपूरचा रहिवासी असून, त्याला पकडण्यासाठी महाराष्ट्र पोलीस दिल्ली, हरियाणा, आग्रा आणि बिहारमध्ये छापे टाकत आहेत.

प्रश्नपत्रिका फुटीमध्ये पत्नीचा सहभाग? - महाराष्ट्र पोलिसांकडून मिळाली माहिती आणि पाटणा पोलिसांमधील सूत्रांनी दिलेल्या वृत्तानुसार, बिहारमधील पाटणा इथं सुमन कुमारीला अटक करण्यात आली आहे. सध्या एक पथक तिची चौकशी करत आहे. या चौकशीतून असं समोर आलं आहे की, महाराष्ट्रातील प्रश्नपत्रिका फुटीशी संबंधित आर्थिक व्यवहारांमध्ये सुमन कुमारीचा सहभाग होता. टीईटी () परीक्षेची प्रश्नपत्रिका फ ुटल्यानंतर, सुमन कुमारी या पती विजेंद्र कुमार गुप्ता आणि या कारस्थानात सामील असलेल्या नेटवर्कमधील इतर सदस्यांच्या संपर्कात होत्या, असा पोलिसांना संशय आहे.

या प्रकरणात आतापर्यंत काय घडलं? : याआधी महाराष्ट्र पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली होती. प्रश्नपत्रिका फुटीच्या प्रकरणातील एका महत्त्वपूर्ण कारवाईत, पोलिसांनी पाटणा येथून राजीव साव आणि आकाश कुमार यांना अटक केली. याव्यतिरिक्त, हरियाणातील पानिपत येथील रहिवासी असलेल्या धीरज कुमारलाही ताब्यात घेण्यात आलं. या तिन्ही आरोपींच्या कसून केलेल्या चौकशीतून मुख्य सूत्रधार म्हणून विजेंद्र गुप्ता याचं नाव प्रामुख्यानं समोर आलं आहे.

मुख्य सुत्रधार विजेंद्र गुप्ता अद्यापही फरार : पेपर फुटीच्या संपूर्ण नेटवर्कचा मुख्य सूत्रधार असलेल्या विजेंद्र गुप्ताचा शोध सुरूच आहे. पोलीस तपासात तोच या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार असल्याचं निष्पन्न झालं आहे. त्याला अटक करण्यासाठी महाराष्ट्र, बिहार आणि शेजारील अनेक राज्यांतील पोलीस दलांची पथकं त्याच्या संभाव्य लपण्याच्या ठिकाणांवर सातत्यानं छापे टाकत आहेत. आरोपी विजेंद्र हा समस्तीपूर जिल्ह्यातील विद्यापती पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेरपूर गावचा रहिवासी आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : बळीराजाच्या स्वाभिमानाला नवे बळ!

महाराष्ट्र ही संतांची, पुरोगामी विचारांची आणि अहोरात्र कष्ट करणाऱ्या बळीराजाची भूमी आहे. राज्याची अर्थव्यवस्था, ग्रामीण विकास आणि सामाजिक जीवनाची वीण ही शेती व शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांवर उभी आहे. निसर्गाची अनिश्र्चितता, अवकाळी पाऊस, दुष्काळ, बाजारभावातील चढ-उतार आणि वाढता उत्पादन खर्च अशा असंख्य संकटांचा सामना करत अन्नदाता आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहतो. अशा या शेतकऱ्याला केवळ सहानुभूतीची नव्हे, तर आर्थिक स्थैर्य, विश्र्वास आणि शासनाच्या भक्कम पाठबळाची आवश्यकता असते.

याच भावनेतून महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' जाहीर केली आहे. ही योजना केवळ कर्जमाफीची घोषणा नसून, शेतकऱ्यांच्या स्वाभिमानाला बळ देणारे, ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी गती देणारे आणि शेती क्षेत्रात नवचैतन्य निर्माण करणारे एक ऐतिहासिक पाऊल आहे.

महाराष्ट्रात दरवर्षी १ जुलै हा दिवस 'कृषी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरित क्रांतीचे प्रणेते स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. आधुनिक शेती, सिंचन, पीकपद्धतीतील बदल आणि कृषी विकासाच्या दूरदृष्टीपूर्ण धोरणांमुळे त्यांनी महाराष्ट्राला अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबनाच्या दिशेने नेले. 'शेतकरी समृद्ध झाला तरच राज्य समृद्ध होईल,' हा त्यांचा दूरदर्शी विचार आजही तितकाच प्रेरणादायी आहे.

स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या याच विचारांचा वारसा पुढे नेत महाराष्ट्र शासनाने जून २०२६ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत थकबाकीदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीककर्जाची माफी जाहीर करण्यात आली आहे. त्याचबरोबर, प्रतिकूल परिस्थितीतही प्रामाणिकपणे कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शिस्तीचा आणि प्रामाणिकपणाचा सन्मान करत त्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णयही शासनाने घेतला आहे. त्यामुळे ही योजना केवळ कर्जमाफीपुरती मर्यादित न राहता, आर्थिक शिस्तीलाही प्रोत्साहन देणारी ठरते.

राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध आहे. राज्य शासनाने शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेअंतर्गत ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

याशिवाय, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या आणि ज्यांची खाती बँकांकडे अनुत्पादित मालमत्ता (एनपीए) म्हणून वर्गीकृत झाली आहेत, अशा शेतकऱ्यांसाठीही शासनाने दिलासादायक भूमिका घेतली आहे. बँकांसोबत 'एकवेळ समझोता' (जपश ढळाश डर्शीींश्रशशपीं - जढड) करण्याच्या माध्यमातून या शेतकऱ्यांना नव्याने आर्थिक प्रवाहात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या योजनेत करण्यात आला आहे. त्यामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना नव्याने उभारी मिळण्याचा मार्ग खुला होणार आहे.

कोणतीही योजना केवळ घोषणांपुरती मर्यादित न राहता तिचा लाभ शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पारदर्शक, वेगवान आणि प्रभावीपणे पोहोचला पाहिजे, या भूमिकेतून शासनाने अंमलबजावणीची मजबूत यंत्रणा उभारली आहे. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी थेट मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हानिहाय आवश्यक निधीची तातडीने उपलब्धता करून देण्यात आली असून, महाआयटीच्या माध्यमातून संपूर्ण प्रक्रिया डिजिटल, पारदर्शक आणि वेळबद्ध करण्यात आली आहे. शासनाच्या कार्यपद्धतीतील ही गतिमानता आणि उत्तरदायित्व या योजनेच्या यशाला अधिक बळकटी देणारे ठरणार आहे.

ही कर्जमुक्ती योजना म्हणजे केवळ आर्थिक मदतीचा कार्यक्रम नाही; तर बळीराजाच्या आत्मविश्र्वासाला नवसंजीवनी देणारा, त्याच्या स्वाभिमानाचा सन्मान करणारा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नव्या उमेदीने पुढे नेणारा परिवर्तनाचा संकल्प आहे. कृषी दिनाच्या पावन निमित्ताने शेतकऱ्यांच्या हितासाठी उचललेले हे ऐतिहासिक पाऊल महत्वाचे ठरणार आहे. या योजनेच्या बळावर महाराष्ट्रातील बळीराजा नव्या आत्मविश्र्वासाने उभारी घेईल, शेती अधिक सक्षम बनेल आणि ग्रामीण समृद्धीचा नवा अध्याय लिहिला जाईल.

**- वर्षा फडके - आंधळे**
**उपसंचालक (वृत्त)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# खुणाच्या गुन्ह्यातील आरोपीस १२ तासाच्या आत ठोकल्या बेड्या!

## स्थानिक गुन्हे शाखेची धाडसी कारवाई

**माजलगाव/प्रतिनिधी :** एका खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीस १२ तासाच्या आत स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी बेड्या ठोकल्या आहेत ही कारवाई बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी,कर्मचारी यांनी केली आहे. या कारवाईचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तालखेड येथील मयत इसम नामे विकास दत्तात्रय वाघमोडे वय ३३ वर्षे त्यांचे प्रेत हे त्यांच्या शेताजवळ दिनांक २९ जून २०२६ रोजी मिळून आले होते.

यावरून माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२९३/२०२६ कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता,अन्वये अज्ञात इस्माविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंद झाला होता. सदरील गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा बीड हे करीत होते. दिनांक २९ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाने सदरील गुन्ह्यांच्या घटनास्थळास भेट दिली व अज्ञात आरोपीचा शोध सुरू केला होता.

अज्ञात आरोपीचा शोध घेत असताना पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांना माहिती मिळाली की, मयत विकास वाघमोडे यांचे काही दिवसापूर्वी आदित्य बारवाळ यांच्या सोबत जोरदार भांडण झाले होते. व आदित्य याने मयत विकास वाघमोडे यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती. यावरून आदित्य बारवाळ यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेऊन अधिक विचारपूस करण्यास सुरुवात केली असता. आदित्य बारवाळ यानी चौकशी दरम्यान सांगितले की, मयत विकास वाघमोडे यांनी पुणे येथे मारहाण केली होती तसेच पंधरा दिवसांपूर्वी तालखेड फाटा येथे भांडण करून अंगावर कुऱ्हाड घेऊन मारण्यास धावून आला होता व त्याने मला जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती.

या दोन्हीही भांडणाचा राग मनात धरून आदित्य बारवाळ याने विकास वाघमोडे यास ठार करण्याचे ठरवले होते. यावरून मयत विकास वाघमोडे यांचा दिनांक २८ जून २०२६ रोजी रात्रीच्या वेळी ११-०० वाजण्याच्या सुमारास विकास वाघमोडे यांचा गावातून पाठलाग करत त्यांच्या मागे त्यांच्या शेताकडे जाणाऱ्या रस्त्याने जाऊन विकास वाघमोडे यांना एकटा पाहून त्यास आडवून वाघमोडे यांच्या पोटावर दोन वेळा व गळ्यावर एक वार चाकूने करून विकास वाघमोडे यांना ठार केले व घरी आलो असे आदित्य बारगळ यानी सांगितले.



सदरचा गुन्हा आदित्य बारवळ यांनी केला असे बारवाळ यांनी कबूल केल्याने त्यास पुढील कारवाई कामी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरील खुनाच्या गुन्ह्यात अज्ञात आरोपी स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी निष्पन्न करून त्यास अवघ्या बारा तासाच्या आत अटक केले आहे. सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत,अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस उपधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक विजयकुमार रामोड, पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोह/बप्पासाहेब घोडके, पोह/महेश जोगदंड,पोह/जफर पठाण,पोह/दिलीप गीते, चापोह/गणेश मराडे यांनी केली आहे.

## राज्यसभा खासदार : डॉ. ज्योतीताई वाघमारे यांच्या हस्ते राणी खंडागळे यांना लोकराजा राजर्षी शाहू छत्रपती प्रेरणा पुरस्काराने सन्मानित



**पुणे/ स्नेहा उत्तम मडावी:** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय व सातत्यपूर्ण कार्याबद्दल कोल्हापूर येथील राणी जयराम खंडागळे यांना 'लोकराजा राजर्षी शाहू छत्रपती प्रेरणा पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पुणे पत्रकार प्रतिष्ठान येथे शांतिदूत परिवार, डॉ. सुरेश डी. एम. राठोड फाउंडेशन, सर्विस बेंच फाउंडेशन, इंडियन पोलिस मित्र भारत आणि विशेष कार्यकारी अधिकारी न्याय हक्क जनजागृती फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला राज्यसभेच्या खासदार डॉ. ज्योतीताई वाघमारे, आयकर आयुक्त शिवकुमार साळुंखे, आयएएस डॉ. मोहन गावंडकर, आयपीएस डॉ. दिनेश वारी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी, लोकहिताची जाणीव, समाजप्रबोधन आणि सेवाभावी कार्याची दखल घेत राणी खंडागळे यांची या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांनी हा सन्मान समाजकार्यात प्रेरणा देणारा असून भविष्यातही अधिक जोमाने समाजहिताची सेवा करत राहण्याचा निर्धार व्यक्त केला. या सन्मानाबद्दल विविध सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी राणी खंडागळे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## आयआयटी अभियंत्याकडून बनावट नोटांची छपाई, छापा टाकताच पोलीसही चक्रावले!

फरीदाबाद - सुरजकुंड पोलिसांनी दक्षता दाखवून केलेल्या त्वरित कारवाईमुळे बनावट नोटांच्या प्रकरणात महत्त्वाची बाब समोर आली आहे. गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सोमवारी हॉटेल सरोवर पोर्टिकोमधील एका खोलीची तपासणी केलीय. तेव्हा त्यांना नोटा छापण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य, बनावट नोटा आणि इतर उपकरणे ताब्यात घेतलीत. बनावट नोटा प्रकरणात पोलिसांनी केलेली कारवाई हे मोठं यश मानलं जात आहे.

नोटांच्या छपाईशी संबंधित कागद आणि उपकरणे जप्त- हॉटेलमधील एका खोलीत काही संशयास्पद माहिती मिळाल्याची पोलिसांना माहिती मिळाली होती. त्याचा वापर बनावट नोटा छापण्यासाठी करण्यात येत होता. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. तेव्हा त्या खोलीत कोणीही उपस्थित नव्हते. पोलिसांनी खोलीत तपासणी केली असता तेथून लॅपटॉप, एक प्रिंटर आणि नोटा छापण्यासाठी लागणारे विशेष कागद आणि ५०० रुपयांची बनावट नोट आणि १०० रुपयांच्या १० बनावट नोटा आढळून आल्या. त्याचबरोबर बनावट नोटा छापण्यासाठी इतर अनेक साहित्य जप्त करण्यात आले. पोलिसांनी सर्व साहित्य जप्त करून ते सुरक्षित ठेवले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी शेतकऱ्यांनी कर्जखात्याला 'आधार' संलग्न करावे- जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाने राज्यातील बळीराजाला मोठा दिलासा देण्यासाठी घोषित केलेल्या 'पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' अंमलबजावणी आता अंतिम टप्यात आहे. या योजनेचा थेट लाभ शेतकऱ्यांना लवकर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी आपली आधार माहिती बँकेच्या शाखेत द्यावी असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले यांनी केले आहे.

आधार प्रमाणीकरण पूर्ण होताच, जुलैच्या दुसऱ्या आठवड्यापासून पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर लाभाची रक्कम जमा करण्याचे सहकार विभागाचे नियोजन आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे महाराष्ट्रातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांची आर्थिक मदत मिळणार आहे.

सहकार आयुक्त व निबंधक तसेच जिल्हा बॅंकर्स समितीकडून व्यापारी आणि सहकारी बँकांना पात्र शेतकऱ्यांचे आधार क्रमांक घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीसाठी सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांची कर्ज खात्याची माहिती अपलोड झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना स्वतंत्र विशिष्ट कर्ज खातेनिहाय नंबर दिला जाणार आहे. पात्र शेतकऱ्यांची यादी बँक शाखा, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय आणि पोर्टलवर प्रसिद्ध केली जाणार आहे.

आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकऱ्याच्या कर्जखात्यात लाभाची रक्कम जमा केली जाणार आहे. या योजनेचा लाभ मिळालेल्या शेकऱ्यांना चालू हंगामासाठी नव्याने कर्ज पुरवठा करण्याच्या सूचना सर्व बँकांना देण्यात आल्या आहेत. या योजनेमधील पात्र सर्व शेतकरी नवीन पीक कर्ज घेऊ शकतील.


या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि तरतुदी

या योजनेअंतर्गत २ लाख रुपयांपर्यंतची अल्पमुदतीची पीक कर्जमुक्ती केली जाईल. यामध्ये थकीत, पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जांचाही समावेश आहे. ज्या शेतकऱ्यांचे कर्ज २ लाख रुपयांपेक्षा जास्त आहे, त्यांच्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी दोन लाखावरील रक्कम बँकेत भरल्यानंतर त्यांना दोन लाखाच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात देणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्यांना ५० हजारांचे प्रोत्साहन

प्रामाणिकपणे व नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांचा आत्मविश्र्वास वाढवण्यासाठी त्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनपर अनुदान दिले जाणार आहे. विशेष म्हणजे, यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेले शेतकरीही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र असणार आहेत.

या योजनेचा उद्देश केवळ कर्जमाफी देणे एवढाच नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्र्वास वाढविणे आणि राज्यातील शेती क्षेत्राला नवसंजीवनी देणे हा आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही विलंबाशिवाय बँकेत जाऊन आपले कर्ज खाते आधारशी संलग्न करून घ्यावे. असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाकडून करण्यात आले आहे.



(मुंबई येथे पीएसआय म्हणून कार्यरत असणारे केदार सुदामराव गरड यांची समाज कल्याण विभागात सहाय्यक आयुक्त पदी निवड झाल्याबद्दल काल केज तालुक्यातील धर्माळा येथे सत्कार करण्यात आला. यावेळी पोलीस पाटील तथा बीड जिल्हा पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष कृष्णा कदम तसेच माजी सरपंच वैजनाथ सोळंके ग्रामपंचायत सदस्य सुभाष कदम उद्धव कदम, भागवत कदम, प्रशांत कदम, बालाजी जाधव इतर मान्यवर उपस्थित होते...)

## 'एल निनो'चे संभाव्य संकट जलसंधारणासाठी इष्टापत्ती; कमी कालावधीत पूर्ण होऊ शकणारी जलसंधारणाची कामे प्राधान्याने पूर्ण करा: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी :** विविध हवामान संस्थांनी या वर्षीच्या पावसाळ्यामध्ये 'एल निनो'बाबत दिलेल्या इशाऱ्यांबाबत शासन गंभीर आहे. यामुळे निर्माण होऊ शकणारी संभाव्य टंचाई परिस्थिती यशस्वीपणे हाताळण्यासाठी शासन सज्ज आहे. त्यामुळे एल निनोचे संभाव्य संकट हे जलसंधारणासाठी इष्टापत्ती असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कमी कालावधीमध्ये पूर्ण होऊ शकणारी जलसंधारणाची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. विधान भवनातील मंत्रिमंडळ सभागृहात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा (कृष्णा आणि गोदावरी खोरे पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड उपस्थित होते. राज्यामध्ये नादुरुस्त असलेले कोल्हापुरी बंधाऱ्यांना प्राधान्याने दुरुस्त करण्यासाठी धडक कार्यक्रम राबवण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नादुरुस्त असलेले कोल्हापुरी बंधारे 'आर्च पद्धतीने ' पुलवजा करण्याबाबत पडताळणी करण्यात यावी. जलसंधारणाचे कुठलेही नवीन काम न घेता दुरुस्तीची कामे प्राधान्याने पूर्ण करावी. आपत्ती व्यवस्थापन विभागाने मागील वर्षांमध्ये महाराष्ट्रातील गंभीर दुष्काळी परिस्थिती असलेले भाग चिन्हांकित करावे. संबंधित भागात तत्कालीन परिस्थितीमध्ये राबविण्यात आलेल्या उपाययोजनांच्या अहवाल द्यावा. त्यावर आधारित किंवा आवश्यक ते बदल करून यावेळी उपाययोजना करण्यात याव्यात.

कामे पूर्ण करण्यास असलेला कालावधी लक्षात घेता या कामांसाठी गतीने प्रक्रिया राबवावी. नादुरुस्त कोल्हापुरी बंधारे दुरुस्त करण्यासाठी जिल्हा नियोजनमधून निधीची तरतूद करण्यात यावी. नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांमध्ये दुरुस्ती करताना धातू विरहित पद्धतीचा पर्याय शोधण्यात यावा. ही उपाययोजना कायमस्वरूपी असावी. याबाबत यंत्रणा निश्र्चित करून संबंधित यंत्रणेकडे संपूर्ण जबाबदारी देण्यात यावी. संभाव्य परिस्थिती लक्षात घेता लवकर पूर्ण होतील, अशीच जलसंधारणाची कामे हाती घेण्यात यावीत. याबाबत संपूर्ण कार्यवाहीचे अधिकार पाटबंधारे विकास महामंडळ स्तरावर देण्यात यावेत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांसोबतच जलस्त्रोतांचे बळकटीकरण करण्यात यावे. यासाठीही कार्यक्रम हाती घेण्यात यावा. राज्यामध्ये कृषी क्षेत्रात सौर ऊर्जा निर्मितीची चांगली परिसंस्था निर्माण होत आहे. यामधून निर्मित होणारी सौर ऊर्जेचे वितरण करण्यात यावे. त्यामुळे पारेषण व्यवस्थित होऊन महावितरणच्या यंत्रणेवर ताण येणार नाही. सौर ऊर्जा विषयक उपकरणांच्या दुरुस्तीसाठी संबंधित गाव, पाड्यात दुरुस्तीबाबत कौशल्य विकासाचा कार्यक्रम राबविण्यात यावा . यामुळे स्थानिक बेरोजगार युवक युवतींना रोजगारही उपलब्ध होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या कृषीसाठी विजेचा जास्त वापर असलेल्या जिल्ह्यांसाठी वेगळे नियोजन करण्यात यावे. येथील 'फिडर'वर लोड येऊन 'फिडर' बंद पडण्याच्या घटना घडतात. त्यामुळे शेतकऱ्यांना अखंडित वीजपुरवठा होत नाही. या जिल्ह्यांमध्ये ' फिडर ' वर दबाव न येता विजेचे वहन एका फिडरवरून दुसऱ्या फिडरवर करता येईल, अशा पद्धतीने व्यवस्था निर्माण करण्यात यावी.

बैठकीस मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रविण परदेशी, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता, मृद व जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते, तर विदर्भ, तापी, गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक दूरदृश्य संवाद प्रणाली द्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

राज्यामध्ये जलसंपदा विभाग आणि मृद व जलसंधारण विभागाकडे कोल्हापुरी बंधारे आहेत. त्यापैकी ९७६ कोल्हापुरी बंधारे जलसंपदा विभागाकडे असून मृद व जलसंधारण विभागाकडे १३६७ कोल्हापुरी बंधारे आहेत. यापैकी नादुरुस्त कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या दुरुस्तीनंतर २ लाख ३९ हजार १८१ हेक्टर सिंचन क्षमता राज्यात निर्माण होणार आहे.

## डॉक्टरांना वंदन

जनसेवा हीच जनार्दन सेवा असे मानून सेवा करणाऱ्या सर्व डॉक्टरांना हार्दिक शुभेच्छा..

जीव रक्षक आहेत डॉक्टर, हे नारायण आहेत तऱ्हेतऱ्हेच्या वैद्यशास्त्राचे पारायण करणारे आहेत मृदू बोलण्याने संकट हरण करणारे वेंकटरमण आहेत तन-मनाला जडलेल्या भयकारी रोगांचे हरण करणारे आहेत..

फळाची अपेक्षा न ठेवता सेवा करणारे थकवा न जाणणारे कर्मयोगी आहेत दिवसरात्र न पाहता आरोग्य रक्षणात गुंतलेले शिपाई आहेत.. पशु-पक्षी आणि परस्परांच्या स्वास्थ्याचे रक्षक आहेत पाश सोडवून यमालाही आव्हान देणारे आहेत विष न पेरता निर्मळ मनाचे वृत्ती-निरत आहेत, ईश्वर सेवेपेक्षा जनसेवेला वाहून घेतलेले शक्तीदाते आहेत..

जसे सैनिक देशाच्या रक्षणासाठी नेहमी सज्ज असतात, तसेच रुग्णांना बरे करण्यासाठी डॉक्टर सज्ज असतात..



**अमृता सिद्धप्पा चौधरी**
विजयपूर

# आनंदगाव-सारणी रस्त्याची चाळण: गुडघाभर खड्ड्यांतून विद्यार्थ्यांचा जीवघेणा प्रवास; प्रशासनाचा निषेध

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील आनंदगाव ते पी.डी.एस. माध्यमिक विद्यालय (सारणी) हा महत्त्वाचा रस्ता सध्या 'रस्ता' नसून मृत्यूचा सापळा बनला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून, प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. या रस्त्यावरील गुडघाभर खड्ड्यांनी आणि साचलेल्या चिखलाने सामान्य नागरिक, शेतकरी आणि विशेषतः विद्यार्थ्यांचे हाल केले असून, आता ग्रामस्थांचा संयम सुटला आहे. केवळ एक किलोमीटरचा अडथळा, तरीही प्रशासन सुस्त आनंदगाव आणि सारणी परिसरातील नागरिक, विद्यार्थी, व्यापारी आणि शेतकरी केज बाजारपेठेसाठी दररोज याच मार्गाचा वापर करतात. मात्र, केवळ एक किलोमीटरच्या अंतरासाठी येथील प्रवाशांना अर्धा-अर्धा तास खर्ची घालावा लागत आहे. रस्त्यावर खडी उखडली असून गुडघाभर खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यांत पाणी आणि चिखल साचल्याने हा मार्ग आता 'पांदण रस्ता' झाला आहे की काय, असा संतप्त प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

विद्यार्थ्यांचा 'चिखल-प्रवास' शाळेत जाणाऱ्या चिमुरड्या विद्यार्थ्यांची अवस्था तर अत्यंत बिकट झाली आहे. रस्त्यावर साचलेले पाणी आणि चिखलातून जीव मुठीत धरून विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागत आहे. अनेकदा दुचाकी घसरून अपघात होत असून, विद्यार्थ्यांचे कपडे आणि शैक्षणिक साहित्य चिखलात माखले जात आहे. पावसाळ्यापूर्वी दुरुस्तीची अपेक्षा असताना, संबंधित विभागाने बघ्याची भूमिका घेतल्याने पालकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. एका किलोमीटरच्या अंतरासाठी अर्धा तास लागत असेल, तर त्यापेक्षा पांदण रस्ता बरा. प्रशासनाला वारंवार निवेदने दिली, पण त्यांना लोकांच्या त्रासाचे काहीही पडलेले नाही. अनेकदा वाहने घसरून पडत आहेत, प्रशासन अपघाताची वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल पालक करत आहेत.

दरम्यान, वारंवार मागणी करूनही रस्ता दुरुस्त होत नसल्याने आता गावकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. आता केवळ विनंती नाही, तर कृती होईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. रस्ता डांबरीकरण करण्याचे काम तातडीने हाती न घेतल्यास, येत्या काही दिवसांत तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. आता या रस्त्याच्या दुरवस्थेकडे प्रशासन लक्ष देते की, अपघातांची वाट पाहते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



# ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी सक्ती निर्णय अंमलबजावणी होणार आहे किंवा नाही

## प्रसिध्दी माध्यमातून जाहीर करण्याची विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या कडे समितीची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी सक्ती निर्णय अंमलबजावणी होणार आहे किंवा नाही पालक/विद्यार्थ्यां मध्य संभ्रमित वातावरण असल्याने शासनाची या बाबतची भूमिका प्रसिध्दी माध्यमातून जाहीर करण्याची निवेदनाच्या माध्यमातून लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीची विभागीय शिक्षण उपसंचालक लातूर यांच्या कडे मागणी देण्यात आलेल्या निवेदनात महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता ११ वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी चालू शैक्षणिक वर्षात बायोमेट्रिक हजेरी (Biometric Attendance) सक्तीची केली आहे

खाजगी शिकवण्यांच्या (उेरलहळपस उश्ररीीशी) वाढत्या प्रभावाला आळा घालण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे या नवीन नियमावलीत विद्यार्थ्यांना किमान ७५ टक्के उपस्थिती असणे बंधनकारक करण्यात अली असल्याने ज्या विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५ टक्क्यांपेक्षा कमी भरेल, त्यांना बोर्ड परीक्षेचे हॉल तिकीट दिले जाणार नाही विद्यार्थ्यांची हजेरी यंत्र आणि सीसीटीव्ही थेट शिक्षण विभागाच्या सर्व्हरशी जोडलेले असतील त्यामुळे यात फेरफार करणे किंवा बोगस हजेरी दाखवणे अशक्य होणार आहे सीसीटीव्ही महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी वर्गात खरोखर उपस्थित आहे.

या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना नियमित कॉलेजला न जाता फक्त शिकवण्या करणाऱ्या विद्यार्थ्यांवर मोठा आळा बसणार असल्याचे बातम्या होत्या पण याची प्रतक्ष अंमलबजावणी अद्याप दिसून येत नाही यात खाजगी शिकवणी चालकाकडून आम्ही सर्व म्यानेज करणार असल्याचे पालकांना आश्र्वासन देऊन पूर्ण वर्षाचे नगदी पैसे भरून विद्यार्थ्यांना प्रवेश दिले जात आहेत प्रतक्षात खाजगी शिकवण्या सुरू करण्यात आल्या पण शासनाच्या निर्णय अंमलबजावणी दिसून येत नसल्याने पालकांना नीट पूर्व परीक्षा खाजगी शिकवणी वर्गात प्रवेश द्यावा किंवा नाही संभ्रमावस्था निर्माण झाल्याने समस्या निर्माण झाली असल्याचे नमूद करून या संदर्भात शासनाची भूमिका प्रसिध्दी माध्यमातून जाहीर करण्याच्या मागणीचे लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीच्या वतीने शिक्षण उपसंचालक यांना निवेदन देण्यात आले निवेदनावर समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, सचिव बाबासाहेब बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते लालासाहेब शेख,संजय उदारे, भगवेश्वर धनगर यांच्या स्वाक्षऱ्या होत्या.




## संभाजी महाविद्यालयात योग दिवस उत्साहात संपन्न



**मुरुड /महेंद्र आल्टे:** येथील संभाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात रविवार दिनांक २१ जून २०२६ रोजी बारावा जागतिक योग दिन उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला.सदरील कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमासाठी पतंजली योग समिती व भारत स्वाभिमान न्यासाचे शाखा मुरुडचे योग प्रवर्तक योग प्रशिक्षक व त्यांचे सहाय्यक जातीने उपस्थित होते.

श्रीमान काशिनाथ जी खंडेलवाल श्री नंदकिशोर कचोळ्या श्री धनंजय बोरकर यांच्या उपस्थितीत शक्ती देवता श्री बजरंग बली च्या प्रतिमेचे पूजन करून पाहुण्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. भारत सरकार आयुष्य मंत्रालय मिनिस्ट्री ऑफ आयुर्वेद द योगा व निसर्गोपचार युनानी सिद्धी व होमिओपॅथी च्या मार्गदर्शक पुस्तिके अन्वये योग संगम कार्यक्रम पार पाडण्यात आला. कॉमन योगा प्रोटोकॉल बरोबरच योग समावेश,हरित योगा,साम्ययोगा,योगा अनप्लगड, इत्यादी बाबत जागृती करण्यात आली.

योग प्रशिक्षकाद्वारे प्रातःकाळी आठ ते दहा या वेळेमध्ये सर्वसाधारण व्यायाम प्रकार बैठ्या व खडे स्थितीतील विविध योगासने पाठीवर उताणे झोपून व पोटावर पालथे पडून करावयाची विविध असणे प्रात्यक्षिकाद्वारे प्रस्तुत करून सर्वांकडून करून घेतली. प्राणायामाचे विविध प्रकार ध्यान शांभवी मुद्रा योगाची प्रार्थना योग संकल्प व शांतीपाठ घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.मधुकर क्षीरसागर यांनी केले.

योग दिनाच्या निमित्ताने योगावर भाष्य करताना त्यांनी योगाची व्याख्या, वाढ व विकासातील टप्पे मूलभूत योग व परंपरागत योग शिक्षणाची गुरुकुले, आरोग्य व मानव जातीच्या कल्याणासाठी योगाचे महत्त्व,योगा फोर हेल्दी एजिंग( निरोगी वृद्धत्वासाठी योग ) या थीम वरती मार्गदर्शन केले. तुम्ही स्वतः निरोगी राहून पर्यावरण संतुलन रक्षणासाठी मानव जातीच्या संयमीत संतुलित शांततेसाठी ऐक्यासाठी, निरोगी योगीक भारतीय निरोगी योगीक भारतीय जीवन प्रणाली योगाचे मानवी दैनंदिन जीवनातील महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन केले.


कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला. एकंदरीत जागतिक योग दिवस उत्साहात आनंदात व मंगलमय वातावरणात महाविद्यालयात पार पडला.

## विकसित भारत रोजगार व अजिवीका हमी अभियान'; २ जुलै रोजी लातूरमध्ये जिल्हास्तरीय शुभारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** भारत सरकारद्वारे नव्याने मंजूर करण्यात आलेला 'विकसित भारत रोजगार व अजिवीका हमी अभियान (ग्रामीण)' (व्हीबीजी-राम-जी) अधिनियम-२०२५ हा राज्यात १ जुलै २०२६ पासून सर्वत्र लागू करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम' (मनरेगा) या कायद्याऐवजी आता हा नवीन अधिनियम अस्तित्वात येत आहे. या अभियानाच्या अनुषंगाने २ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील डीपीडीसी हॉलमध्ये जिल्हास्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले असून, त्यांच्यासह बचत गटाच्या महिला सदस्य, योजनेचे लाभार्थी, कामगार युवक आणि स्थानिक ग्रामपंचायत प्रतिनिधी देखील या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमामध्ये योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये आणि त्यातून मिळणारे लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध पोस्टर्स, बॅनर्स आणि घडीपत्रिकांचे (माहिती पुस्तिका) भव्य प्रदर्शनही येथे आयोजित केले जाईल. नवीन 'विकसित भारत रोजगार व अजिवीका हमी अभियान (ग्रामीण)' अंतर्गत आता मजुरांना पूर्वीच्या मनरेगा योजनेतील १०० दिवसांच्या रोजगाराऐवजी तब्बल १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली आहे. हा या नवीन कायद्यातील एक अत्यंत मोठा आणि महत्त्वपूर्ण बदल आहे. सध्या मनरेगा अंतर्गत सुरू असलेली कोणतीही कामे बंद पडणार नसून ती पूर्ववत सुरू राहतील आणि पूर्ण केली जातील. १ जुलैपासून नवीन कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर, त्यातील नियमांनुसार नवीन विकासकामे हाती घेतली जातील. जिल्हा प्रशासनाने या नवीन बदलाचे स्वागत करत संबंधित सर्व घटकांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## पसमंदा मुस्लिमांच्या विकासासाठी शासनाची समिती; इद्रीस मुलतानी यांची अध्यक्षपदी नियुक्ती

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील मुस्लिम पसमंदा समाज आणि लहान जातींचा सर्वांगीण अभ्यास करून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाला उपाययोजना सुचवण्यासंदर्भात शासनाने श्री. इद्रीस मुलतानी यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय अभ्यास समिती स्थापन केली आहे. या अध्यक्षपदाला राज्यमंत्र्यांचा दर्जा आहे. या नियुक्तीचे समाजातील सर्व थरातून तसेच पक्षामधून स्वागत होत असून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. श्री. मुलतानी हे भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष आहेत.



सात सनदी अधिकाऱ्यांचा समावेश असलेली ही राज्यस्तरीय अभ्यास समिती मुस्लिम पसमंदा समाज आणि लहान जातींच्या शैक्षणिक स्थितीचे मूल्यमापन, आर्थिक आणि रोजगाराची स्थिती, त्यांना मिळणाऱ्या सामाजिक आणि पायाभूत सुविधा, महिला आणि तरुणांचे सक्षमीकरण, योजनांची समीक्षा, निधीचा विनियोग याबाबत अभ्यास करणार आहे. या समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक तसेच व्यावहारिक उपाययोजना आणि शिफारशी शासनाला सुचवणार आहे. डेटा संकलन, राज्यातील वेगवेगळ्या विभागांमधील मुस्लिमबहुल भागांमध्ये क्षेत्रीय दौरे, सर्वेक्षण, जनतेकडून सूचना मागवणे अशी कार्यपद्धती असलेली ही समिती एक वर्षात आपला सविस्तर अहवाल आणि शिफारशी शासनाला सादर करेल. भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष असलेल्या श्री. मुलतानी यांनी याआधी सिल्लोड पंचायत समितीचे उपसभापती, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आणि भाजपा प्रदेश सचिव या पदांची जबाबदारी सांभाळली आहे.

## मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने लातूर येथे राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत मार्गदर्शन





**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण २०२६ कार्यक्रमाच्या अनुषंगाने २३५-लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील राजकीय पक्ष प्रतिनिधी आणि मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) यांची बैठक नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील डी. पी. सी. हॉल येथे झाली. मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांच्या अध्यक्षतेखाली या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी लातूरच्या नायब तहसीलदार (निवडणूक) श्रीमती अर्चना मैंदर्गी उपस्थित होत्या.

बैठकीमध्ये विशेष संक्षिप्त पुनरीक्षण-२०२६ कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करणे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडून राबविण्यात येणारी घरभेट मोहीम, आणि बीएलए-१ व बीएलए-२ यांची भूमिका व जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. यासोबतच मतदार यादीची अचूकता, पारदर्शकता आणि सर्वसमावेशकता राखण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध बाबींवर उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी बोलताना मतदार नोंदणी अधिकारी श्रीमती रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी सर्व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमात अत्यंत सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनास आवश्यक ते सर्व सहकार्य करावे, असे आवाहन केले. बैठकीच्या अंतिम टप्प्यात उपस्थित प्रतिनिधींनी मांडलेल्या विविध शंकांचे प्रशासनाकडून योग्य निरसन करण्यात आले. सर्व प्रतिनिधींनी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण-२०२६ कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

## 'विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन' अंमलबजावणीला १ जुलैपासून प्रारंभ

**लातूर/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या विकसित भारत @2047 या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत आणि समृद्ध व सक्षम ग्रामीण भारताच्या निर्मितीसाठी 'विकसित भारत - रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण)' अर्थात 'RAM G अधिनियम, २०२५' लागू करण्यात आला असून याद्वारे अकुशल शारीरिक काम करण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्यांना आता प्रति आर्थिक वर्ष १२५ दिवसांच्या मजुरी-रोजगाराची वैधानिक हमी मिळणार आहे. या मिशनची अंमलबजावणी आज अर्थात १ जुलै २०२६ पासून सुरु होत आहे. या योजनेसाठी जिल्हाधिकारी हे जिल्हा कार्यक्रम समन्वयक, तर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सह कार्यक्रम समन्वयक असणार आहेत.

या अधिनियमांतर्गत हाती घेण्यात येणारे सर्व प्रकल्प हे विकसित भारत राष्ट्रीय ग्रामीण पायाभूत सुविधा स्टॅकचा भाग असतील, ज्यामध्ये प्रामुख्याने जलसुरक्षा व जलसंवर्धन, मूलभूत ग्रामीण पायाभूत सुविधा, उपजीविका आधारित पायाभूत सुविधा आणि आपत्ती प्रतिबंधक कामे अशा चार प्रमुख श्रेणींमधील कामांचा समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण मजुरांना रोजगार उपलब्ध करून देतानाच शेतीच्या पीक हंगामात, विशेषतः पेरणी व कापणीच्या वेळी शेतमजुरांची टंचाई भासू नये, यासाठी राज्यांना एका आर्थिक वर्षात एकूण ६० दिवसांचा कालावधी आगाऊ अधिसूचित करण्याचा अधिकार देण्यात आला असून या काळात या अधिनियमांतर्गत कोणतीही कामे राबवली जाणार नाहीत. मनरेगामध्ये २६६ कामाचा समावेश होता, तर 'विकसित भारत - रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अंतर्गत ३१८ कामे समविष्ट करण्यात आली आहेत.

या योजनेच्या एकूण देखरेखीसाठी राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर संचालन समित्या कार्यरत राहतील तर जिल्हा स्तरावर संपूर्ण नियोजन, अंमलबजावणी आणि समन्वयाची जबाबदारी जिल्हा कार्यक्रम समन्वयक म्हणून जिल्हाधिकाऱ्यांची असेल. या योजनेची प्राथमिक अंमलबजावणी संस्था म्हणून ग्रामपंचायत काम करणार असून मजूर नोंदणी, रोजगार हमी कार्ड जारी करणे आणि प्राधान्यक्रमानुसार किमान ५० टक्के कामांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी तिच्यावर असेल.

योजनेमध्ये संपूर्ण पारदर्शकता आणि जबाबदारी निश्रि्चत करण्यासाठी बायोमेट्रिक प्रमाणीकरण, अवकाशीय तंत्रज्ञानाधारित नियोजन, मोबाईल व डॅशबोर्ड संनियंत्रण आणि साप्ताहिक सार्वजनिक प्रकटीकरण प्रणालीचा वापर केला जाईल, तसेच ग्रामसभेद्वारे नियमित सामाजिक लेखापरीक्षण केले जाईल. अकुशल शारीरिक कामांसाठीचे मजुरी दर केंद्र सरकारकडून निश्रि्चत केले जातील आणि स्वतंत्र दर अधिसूचित होईपर्यंत मनरेगा अंतर्गतचे दर लागू राहतील. मजुरी अदायगीत विलंब झाल्यास भरपाईची तरतूद असून, कामाची मागणी केल्यानंतर निर्धारित कालावधीत काम उपलब्ध न झाल्यास बेरोजगारी भत्ता देण्याची जबाबदारी संबंधित राज्य सरकारची असेल. सध्या मनरेगा अंतर्गत सुरू असलेली कामे बंद न करता चालू ठेवून ती पूर्ण केली जातील आणि नवीन कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर अपूर्ण कामांसोबतच नवीन कामे हाती घेतली जातील. १ जुलै पासून कोणताही खंड न पडू देता अकुशल कामांचे मस्टर काढण्यात येत आहेत.

# हरवलेला मोबाईल... पुन्हा मालकाच्या हाती; लातूर पोलिसांकडून तब्बल १७१ मोबाईल नागरिकांना परत

**लातूर/प्रतिनिधी :** पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या संकल्पनेतून, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात एकाच दिवशी नागरिकांना मोठा दिलासा.

मोबाईल फोन हा आज प्रत्येक व्यक्तीच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. शासकीय कामकाज, बँकिंग व्यवहार, ऑनलाईन पेमेंट, शिक्षण, व्यवसाय, आरोग्य सेवा, वैयक्तिक माहिती, महत्त्वाची कागदपत्रे आणि कुटुंबीयांशी संपर्क अशा असंख्य गोष्टी मोबाईलवर अवलंबून असल्यामुळे मोबाईल हरविल्यानंतर नागरिकांना मोठ्या मानसिक, आर्थिक व प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागतो. अनेक वेळा मोबाईलमधील वैयक्तिक माहितीचा गैरवापर होण्याचीही भीती नागरिकांच्या मनात निर्माण होते.

नागरिकांच्या या अडचणी लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी लातूर जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्याने हरवलेल्या मोबाईलचा तांत्रिक पद्धतीने शोध घेऊन ते शक्य तितक्या लवकर मूळ मालकांच्या ताब्यात द्यावेत, अशा स्पष्ट सूचना जिल्हा सायबर सेल, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा सायबर सेल व सर्व पोलीस ठाण्यांनी अत्याधुनिक तांत्रिक प्रणाली, सीईआयआर पोर्टल तसेच विविध तांत्रिक साधनांचा प्रभावी वापर करून हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम राबविली.



या मोहिमे अंतर्गत लातूर सहित इतर जिल्ह्यातून एकूण १७१ हरवलेले मोबाईल शोधण्यात लातूर पोलिसांना यश आले. त्यानंतर आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून दि. ३० जून २०२६ रोजी पोलीस अधीक्षक अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या हस्ते तसेच उर्वरित मोबाईल संबंधित पोलीस स्टेशन स्तरावर त्या त्या पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांच्या हस्ते संबंधित मोबाईलधारकांना परत करण्यात आले. त्यामुळे जिल्हाभरात एकाच दिवशी शेकडो नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले.

हरवलेले मोबाईल परत मिळाल्यानंतर अनेक नागरिकांनी लातूर पोलिसांचे मनःपूर्वक आभार मानले. पोलीस स्टेशननिहाय परत करण्यात आलेल्या मोबाईलची संख्या पुढीलप्रमाणे आहे :

- शिवाजीनगर २४
- गांधी चौक २३
- उदगीर शहर २१
- एमआयडीसी १६
- मुरूड १५
- विवेकानंद चौक ९
- औसा ९
- उदगीर ग्रामीण ७
- वाढवणा ७
- अहमदपूर ६
- निलंगा ५
- कासार शिरसी ५
- रेणापूर ४
- चाकूर ४
- किल्लारी ४
- भादा ३
- शिरूर अनंतपाळ २
- जळकोट २
- गातेगाव २
- किनगाव १
- देवणी १
- औराद शहाजणी १

नागरिकांच्या हरविलेल्या मालमत्तेचा शोध घेऊन ती पुन्हा त्यांच्या ताब्यात देण्यासाठीही तितक्याच संवेदनशीलतेने कार्यरत असून आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, जिल्हा सायबर सेलचे सातत्यपूर्ण प्रयत्न आणि सर्व पोलीस ठाण्यांमधील उत्कृष्ट समन्वय यामुळे ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

मोबाईल हरवल्यास नागरिकांनी विलंब न करता तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी तसेच सीईआयआर पोर्टलवर मोबाईल ब्लॉक करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन लातूर पोलिसांकडून करण्यात आले आहे. भविष्यातही नागरिकांच्या सेवेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अशाच प्रकारे लोकाभिमुख आणि परिणामकारक उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉर्पीग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.